I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 216-221
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोविड–१९ चा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम

[१]प्रा.स्वप्निल एस. बोबडे, [२]डॉ. समित माहोरे

[१]अर्थशास्त्र विभागप्रमुख
म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
[२]सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
Corresponding Author : swapnilbobademjf@gmail.com, drsamitmahore@gmail.com

| Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022<br>Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022 |
|---|---|---|

**सारांश :**

कोविड–१९ चे गंभीर परिणाम भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतांना दिसून येते. आज भारतीय शेतकरी हा (Subsidy) अनुदानासाठी नाही तर आत्मसन्मानासाठी संघर्ष करतांना दिसून येतो. भारतीय अर्थव्यवस्था कृषीवर आधारित होती, आहे आणि राहील. कृषी क्षेत्राचे महत्व आपल्याला कोविड–१९ च्या महामारीच्या संकटात पाहायला मिळत आहे. भारतात कोरोना काळात उद्योग चक्र थांबले, उत्पादनात घट झाली, व्यापारी व्यवहारात, रोजगार, छोटे–मोठे उद्योग, सरकारी महसूल, उपभोग, शेती, शिक्षण आणि मानवी आरोग्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. तर पर्यावरण, स्वच्छता, आरोग्य यावर अनुकूल परिणाम झाला आहे. कोरोना प्रतिबंधात्मक सरकारने अनेक उपाय योजलेले आहे.

**बीजशब्द :** प्रतिबंधात्मक टाळेबंदी, अर्थचक्र, आत्मसन्मानासाठी विकास दर, भारतीय अर्थव्यवस्था, जीवनशैली, जीवनस्तर, लॉकडाऊन, जनधन खाते, शेतकरी सन्मान योजना, ग्रामीण अर्थव्यवस्था, कृषी अर्थव्यवस्था, कोरोना सर्वमित देश, शेतीपुरक व्यवसाय, उद्योगचक्र, मजुरांचे स्थलांतरण, ई–बुक्स, ई–लर्निंग, गृहकलह, सिमांत शेतकरी, आय.टी.आय. रिटर्न्स, लघु व कुटीर उद्योग.

## प्रस्तावना:

भारतामध्ये कोविड–१९ ने बाधित पहिला रूग्ण ३० जानेवारी २०२० रोजी केरळमधील थ्रिसुर (Thirssur) येथे सापडला तर महाराष्ट्रामध्ये पहिला रूग्ण पुणे येथे ९ मार्च २०२० रोजी सापडला. प्रत्येक देशाचे प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यामुळे सर्व प्रकारचा एकंदर अर्थव्यवहार ठप्प झाल्याने अनेक आर्थिक समस्या निर्माण झाल्या. जसे की, उत्पादन बंद झाल्याने पुरवठ्याची कमतरता, बेरोजगारी, क्रयशक्तीचा व मागणीचा अभाव आणि उपभोगाची समस्या इत्यादीमुळे लोकांचे विशेषत: गरिबांचे जगणे कठीण झाल्याचे दिसून येते. टाळेबंदी चालू ठेवायची की टाळेबंदी हटवून अर्थचक्र चालू ठेवायचे अशा जीवन की आजीविका (Life or Livelihood) यापैकी कोणता निर्णय घ्यायचा हा पेचप्रसंग निर्माण झाला होता.

कोविड–१९ चा पहिला बाधित रूग्ण चीनमधील वूहान प्रांतात सापडल्याने चीनकडून जागतिक आरोग्य संघटनेला ३१ डिसेंबर २०१९ रोजी कळविण्यात आले होते. चीननंतर जगामध्ये इतरत्र त्याचा वेगाने होणारा प्रसार लक्षात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने ३० जानेवारी २०२० रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यविषयक जाणीबाणी जाहीर केली तर ११ फेब्रुवारी २०२० रोजी या विषाणूजन्य आजाराला कोविड–१९ (COVID-19) = CORONA VIRUS DISEASE 2019 असे नाव (NOVEL) विषाणूमुळे होणारा आजार की जो २०१९ मध्ये पहिल्यांदाच आढळला.

कोविड–१९ चे गंभीर परिणाम भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतांना दिसून येते. भारताच्या ळक्च मध्ये भारतीय कृषी क्षेत्राचे योगदान हळूहळू कमी होत आहे. दिशाहिन कायदे, कानून असल्यामुळे लाखो शेतकरी भूमीहिन झाले आहे. अत्याधिक अनिश्चितता, असुरक्षितता आणि नेहमी येणाऱ्या आपत्तीने भारतीय शेतीला जुगार म्हणण्यास भाग पाडले. हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. १९७० मध्ये भारतीय कृषी क्षेत्राचे जीडीपी मध्ये २५ बिलीयन डॉलर योगदान होते. सप्टेंबर २०२० च्या रिपोर्टनुसार औद्योगिक क्षेत्र आणि सेवा क्षेत्राचा विकास दर अनुक्रमे ३८ आणि २० प्रतिशत इतका होता. आज भारतीय शेतकरी हा (Subsidy) अनुदानासाठी नाही तर आत्मसन्मानासाठी संघर्ष करतांना दिसून येतो. मनुष्याच्या मुलभूत गरजा मर्यादितच असून तो अनावश्यक गरजा पूर्ण करण्यामागे आपली मर्यादित संसाधने नष्ट करीत असतो. त्यामुळेच या लॉकडाऊनच्या काळात कोणालाही अनावश्यक वस्तू खरेदी करावीशी वाटली नाही. याउलट सेवाभावी संस्था, सरकार, अशासकीय संस्था ह्या

सामाजिक भावनेने गरीब व गरजू लोकांच्या अन्नविषयक गरजा पूर्ण करतांना दिसत आहेत.

भारतीय अर्थव्यवस्था कृषीवर आधारित होती, आहे आणि राहील. याचे परिणाम आपल्याला कोविड–१९ च्या महामारीच्या संकटात पाहायला मिळत आहे. भारतीय अर्थव्यवस्था लॉकडाऊनमुळे बंद होती. तेव्हा कृषी क्षेत्राचे लोकांच्या घरोघरी अन्नधान्य पोहचविण्याचे काम केले. डॉक्टरांसोबत शेतकरी हा सुद्धा योद्धासारखा लढत आहे. परंतु अत्यंत कष्ट करून उत्पादन प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असूनसुद्धा शेतकऱ्यांची जीवनशैली, जीवनस्तर उंचावू शकला नाही. भारतीय अर्थव्यवस्था सुद्धा जगासोबत अत्यंत वाईट परिस्थितीतून जात आहे. एक मोठा समुदाय स्थलांतरित होवून गावाकडे आल्याने कृषीक्षेत्रावर दबाव वाढला आहे. कच्चा माल शहरापर्यंत या लॉकडाऊन काळात न पोहचल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. उदाहरणार्थ होटेल, रेस्टारेंट बंद असल्यामुळे भाजीपाल्याची मागणी कमी झाली आहे. धार्मिक स्थळे बंद असल्यामुळे नारळ, फुलांची मागणी कमी झाली आहे. मागील काही वर्षात कृषी क्षेत्रातील विकास दर उत्तोरोत्तर कमी होत आहे.

| वर्ष | कृषी क्षेत्रातील विकास |
|---|---|
| २०१२–२०१३ | १.५% |
| २०१३–२०१४ | ५.६% |
| २०१४–२०१५ | –०.२% |
| २०१५–२०१६ | ०.६७% |
| २०१६–२०१७ | ६.३% |
| २०१७–२०१८ | ५.०% |
| २०१८–२०१९ | २.९% |
| २०१९–२०२० | २.८% |
| २०२०–२०२१ | ३.४% |

**Source : According to 1st advanced estimates of National Income Source : CSO**

कोरोनाचे तिसरे वर्ष सुरू आहे. त्यामुळे कोरोना लॉकडाऊन आहे तरी काय? असा प्रश्न जनमानसात निर्माण होणे साहजिकच आहे. लॉकडाऊन म्हणजे काही काळासाठी अर्थव्यवस्थेतील सर्व आर्थिक व्यवहारावर संपूर्ण बंदी किंवा अंशत: बंदी घालणे होय किंवा अर्थव्यवस्थेच्या गतीस ब्रेक लावणे होय. कोरोनामुळे मानवी जीवन चक्राबरोबरच देशातील अर्थचक्र थांबले. उत्पादन आणि बाजारपेठ या अर्थव्यवस्थेतील दोन चाकांना काही दिवसासाठी ब्रेक लावण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. कोरोनाच्या बाधित संख्येत अमेरिका पहिल्या क्रमांकावर असून भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात उद्योग चक्र थांबले, उत्पादनात घट झाली, व्यापारी व्यवहारात, रोजगारात, छोटे–मोठे उद्योग, सरकारी महसूल, उपभोग, शेती आणि देशातील अन्य क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. तर पर्यावरण, स्वच्छता, आरोग्य यावर अनुकूल परिणाम झाले आहेत. कोरोना प्रतिबंधनात्मक सरकारने अनेक उपाय योजलेले आहेत.

उदा. मोफत अन्नधान्यांचे वाटप, जनधन खात्यात महिलांना प्रती ३ महिने ५०० रूपये प्रमाणे १५०० रूपये जमा केले, मोफत कोरोना प्रतिबंधात्मक लस देणे, करसवलती, अनुदाने, शेतकरी सन्मान योजनेमार्फत शेतकऱ्यांच्या खात्यात २००० रूपयाचे अनुदान अशाप्रकारे उपाययोजना करून कोरोनाची साखळी तोडण्यासाठी लॉकडाऊन सारखे उपाय योजलेले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

(१) कोरोनाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणामाची स्थिती समजावणे.

(२) कोरोनाचा कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. दैनिक वर्तमान पत्रातून आलेली माहिती, इंटरनेट, तज्ज्ञांचे लेख इत्यादीचा वापर करून सदर शोध निबंध लिहिला आहे.

कोरोनाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झालेला आहे. लॉकडाऊन म्हणजे काय? असा प्रश्न जनमानसात निर्माण होतो. लॉकडाऊन म्हणजे काही काळासाठी अर्थव्यवस्थेतील सर्व आर्थिक व्यवहारांवर संपूर्ण बंदी किंवा अंशत: बंदी घालणे होय किंवा अर्थव्यवस्थेच्या गतिस ब्रेक लावणे होय. म्हणजे विशिष्ट काळात मानवी आर्थिक व्यवहार बंद ठेवणे होय. कोरोना काळात प्रतिबंधक उपाय म्हणून एका पाठोपाठ अनेक देशांनी लॉकडाऊन केले. भारत सरकारनेही घरी रहा, सुरक्षित रहा असा संदेश देत २५ मार्च २०२१ पासून दुसरे तर तिसरे लाकडाऊन जानेवारी २०२२ पासून लागू करण्यात आले. मानवी जीवन चक्राबरोबरच देशातील अर्थचक्र थांबले

**एकूण कोरोना संक्रमित देश व मृत्यूचे प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | देश | एकूण बाधितांची संख्या | एकूण मृत्यू |
|---|---|---|---|
| १ | यु.एस.ए. | ७८५५६१९३ | ९३२४४३ |
| २ | भारत | ४२४१०९७६ | ५०५३०८ |
| ३ | ब्राझील | २६७७६६२० | ६३३८९४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | फ्रान्स | २१०३९६३९ | १३३६१४ |
| ५ | रशिया | १३१४७६६६ | ३३६७२१ |
| ६ | इंग्लंड | १७९३२८०३ | १५८६७७ |
| ७ | तुर्की | १२४४६१११ | ८९२११ |
| ८ | इटली | ११७६५७६७ | १४९५१२ |
| ९ | स्पेन | १०४३९३०२ | ९४९३१ |
| १० | जर्मनी | ११४११४६४ | ११९७२६ |

Source : https://www.worldometersinfo.com, Dated 09.02.2022

**कोरोनाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम :**

महाभयंकर अशा कोरोनाच्या विषाणूमुळे जगातील अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रेलिया, जपान, जर्मनी, इटली अशा प्रगत देशाप्रमाणेच भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेवर खूपच प्रतिकूल तर काही प्रमाणात अनुकूल परिणाम झालेले दिसून येतात.

**(१) कृषी क्षेत्रावरील परिणाम :**

शेती क्षेत्रातून जवळपास २०.५० कोटी रोजगार प्राप्त होतो. अशा या शेतीक्षेत्रावर कोरोनाचा सर्वात जास्त व मोठा परिणाम हा झालेला दिसून येतो. पिक हानी झालेली असतांना कोरोनाचे संकट भारतावर आले आणि त्यामुळे शेती व शेतकरी दोन्हीही अडचणीत सापडले आहे. कोरोनाच्या काळात भारतातून निर्यात होणाऱ्या फळ व भाजीपाला यावर कोरोनाचा प्रभाव होऊन त्याची निर्यात ५० टक्के कमी झाली.

कोविड–१९ चा आपल्या शेतीवर आणि शेतीपुरक व्यवसायावर सखोल आणि व्यापक परिणाम दिसून येतो. पाऊस अतिरिक्त झाल्याने आणि महापुरामुळे खरीपाचा हंगाम नुकसानीत गेला. मात्र त्या अतिरिक्त पावसाचा परिणाम म्हणून रब्बी पिके धान, ऊस, फळे, भाजीपाला, मिरची, कांदा, लसून, गहू, सोयाबीन, हरभरा, कापूस, ज्वारी यांचा समावेश यात आहे. लॉकडाऊनमुळे सर्व कामे बंद राहिल्याने या पिकाची कापणी आणि काढणी करता आली नाही आणि नुकसान झाले. तसेच प्रक्रिया उद्योग यात दुग्ध, कुक्कुटपालन, फळप्रक्रिया उद्योग बंद राहिल्याने मोठे नुकसान झाले आहे. एकूण शेतमजुरांपैकी ५४.९ टक्के भूमिहीन तर ४५.१ टक्के अल्पभूधारक आहेत. ४०० दशलक्ष लोकांना टाळेबंदीचा फटका बसला आहे. रोजगार बंद झाल्यामुळे औद्योगिक कामगारांचीही शेतमालाला मागणी कमी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. २०१८–२०१९ मध्ये शेतमाल निर्यातीपासून ३८ अब्ज मिळाले होते ते या वर्षात सोडून द्यावे लागले आहे. बाजारपेठ बंद, वाहतुक सुविधांचा अभाव यामुळे शेतमालाचा उठावच झाला नाही. साखर कारखाने बंद झाल्याने मजुरांवर उपासमारीची पाळी आली आहे. पुढील हंगामासाठी जमिनीची मशागत, खते, बी–बियाणे उपलब्ध करणे आर्थिकदृष्ट्या कठीण होत आहे. टाळेबंदीचा शेती आणि पूरक व्यवसायावरील परिणाम राज्य आणि क्षेत्रनिहाय वेगवेगळा आहे. उदा. एकूण हापूस आंब्याच्या उत्पादनापैकी ५५ टक्के उत्पादन महाराष्ट्रात होते आणि त्यासाठी मुंबई, पुणे आणि कोल्हापूर ही मोठी बाजारपेठ आहे. मात्र या बाजारपेठा बंद असल्याने आणि मागणी घटल्याने उत्पादकाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. असे निरिक्षण आंबा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत मोळक नोंदवितात. मक्काची आधारभूत किंमत १७६० रूपये क्विंटल असतांना ११०० रूपयांना विकावा लागला. कापूस ५५०० रूपये असतांना विदर्भातील शेतकऱ्यांनी ४२०० रूपये पर्यंत खेडा खरेदीने विकावा लागला. मध्यप्रदेशामध्ये उठाव नसल्याने चन्याला प्रति क्विंटल ६०० ते ७०० रूपये कमी मिळाले.

**कोविड–१९ चा कृषी क्षेत्रावरील परिणामांच्या अभ्यासाची आवश्यकता :**

(१) आता जरी धान्य साठा पुरेसा असला तरी भविष्यात टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(२) बाजारपेठा बंद झाल्याने आणि मागणी घटल्याने कृषी उत्पादकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

(३) वाहतूक सुविधा ठप्प झाल्याने व पॅकेजिंग न झाल्याने ७० टक्के मागणी कमी झाली आहे.

(४) शेतमाल आधारभूत (हमीभाव) किंमतीपेक्षा कमी किंमतीला विकावा लागला आहे.

**(२) ग्रामीण उद्योग क्षेत्रावरील परिणाम :**

कोरोनाचा सर्वाधिक वाईट परिणाम भारताच्या उद्योग क्षेत्रावर अधिक सखोल आणि व्यापक झाला आहे. भारतातील उद्योग क्षेत्राचे ३८ टक्क्याने नुकसान झाले आहे. देशातील छोट्या व्यावसायिकावर लॉकडाऊनचा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. टपरीवाले, पानपट्टी, किरकोळ विक्रेते, फळ विक्रेते, भाजी विक्रेते, कापड दुकानदार, फिरते विक्रेते, वाहतुकदार आदी छोटे व्यावसायिक आर्थिक अडचणीत आलेले आहेत. मागील ३ वर्षापासून भारतामध्ये रोजगार निर्मितीपेक्षा कमी आहे. तो रोजगार टिकवून ठेवणे कठीण झाले आहे. सीएमआयईच्या एप्रिल महिन्याच्या अहवालाप्रमाणे बेरोजगारीचा दर वाढून २३.५२ टक्के पर्यंत पोहचला आहे. तो मार्च महिन्यापेक्षा ८.७४ टक्के जास्त आहे.

**(३) रोजगारात प्रचंड घट :**

लॉकडाऊनमुळे उद्योग बंद राहिल्याने ग्रामीण तरूणांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली.

**(४) आर्थिक वृद्धीवरील परिणाम :**

भारत सरकारच्या वित्तमंत्रालयाप्रमाणे भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पादन ;ळक्च्द्ध जुलै २०१९ मधील ५.२ दरावरून जानेवारी २०२० मध्ये ४.१ टक्के आणि टाळेबंदी नंतरच्या काळात ३.१ टक्के पर्यंत घटले आणि ते पुढेही घटत आहे. देशाचा तिमाही वृद्धीदर विचारात घेता तो वर्ष २०१९ मध्ये अनुक्रमे ७.१:, ६.२:, ५.६: आणि ५.८: वरून ५.६:, ५.१:, ४.३: आणि ३.१: राहून पुढे सातत्याने घटत आहे. २०२० मध्ये भारतचा वृद्धीदर १.९: तर चीनचा १.२:, अमेरिका ६.१:, तर जगाचा ३.१: होता. एप्रिल महिन्यात १२.२ करोड लोकांनी रोजगार गमावला आहे. १६ मे २०२१ पर्यंत ग्रामीण बेरोजगारीत १४.३४: ने वाढ झाली तर शहरी बेरोजगारी १७.७१: पर्यंत पोहचलेली आहे.

**(५) उद्योग चक्र थांबले :**

कोरोनाच्या प्रभावामुळे सरकारने संपूर्ण देशात लॉकडाऊन केल्यामुळे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात उद्योग बंद ठेवण्यात आले. त्यामुळे उद्योगाच्या विकासाबरोबरच उत्पादन वाढीवर विपरीत परिणाम झाला.

**(६) उपभोगावर परिणाम :**

लॉकडाऊनमुळे सर्व प्रकारची वाहतूक थांबली. बाजारपेठा बंद झाल्या. बाजारपेठेतील आवक–जावक मंद झाली. ग्राहकांची क्रयशक्ती घसरली. व्यवहारांवर मर्यादा आली त्याचा परिणाम होवून उपभोग कमी झाला. लॉकडाऊन काळात उपभोक्ता वर्ग फक्त जीवनावश्यक वस्तूंची मागणी करित असून अनावश्यक वस्तूंची मागणी पूर्णपणे थांबलेली आहे. आर्थिक उलाढालही लोकांच्या उपभोग पातळीवर अवलंबून असते. तसेच लोकांचे उत्पन्न कमी झाल्यानेही त्याचा उपभोगावर परिणाम झालेला दिसून येतो.

**(७) मजुरांच्या स्थलांतरणाची समस्या :**

प्रवासी गाड्या आणि उड्डणे थांबविण्यात आली. टाळेबंदीच्या काळात परप्रांतीयांवर गंभीर परिणाम झाले. अनेक व्यक्तींना उद्योग बंद पडल्यामुळे नोकऱ्या गमवाव्या लागल्या आणि परत त्यांच्या मूळ ठिकाणी जाण्यामध्ये वाहतूक थांबल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. उत्तरप्रदेशात सर्वाधिक (३२.४९) लाख स्थलांतरित लोकसंख्या आढळली आहे. त्यानंतर बिहार (१५.००) लाख आणि पश्चिम बंगाल (१३.८४) लाख आहेत. परतीचा प्रवास करणाऱ्यापैकी जवळपास ६० टक्के स्थलांतरित या तीन राज्यांमध्ये होते. केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार टाळेबंदीच्या दरम्यान एक कोटीहून अधिक प्रवासी परत गेले.

**(८) वाहतुक व दळणवळण क्षेत्रावर परिणाम :**

लॉकडाऊनच्या काळात अत्यावश्यक वाहतुक सेवा सुरू राहिलेली आहे. मात्र सर्व वाहतुक उदा. रेल्वे, रस्ते, विमान सेवा अंशतः व पूर्णतः थांबलेली असल्यामुळे या क्षेत्रावर अतिशय गंभीर परिणाम होऊ शकतो.

**(९) बांधकाम क्षेत्रावर परिणाम :**

ग्रामीण भागापासून मोठ्या शहरातील सर्व बांधकामे उदा. रस्ते, पूल, इमारती, धरणे, मोठे प्रकल्प, इतर छोटी कामे इत्यादी सर्व प्रकारची बांधकामे बंद झाल्याने त्याचा परिणाम या क्षेत्रावरील गुंतवणुकीवर निश्चितच होऊ शकतो आणि रोजगारवरही होतो.

**(१०) आर्थिक विकास कमी झाला :**

देशातील सुक्ष्म, लघू, कुटीर व मोठे उद्योग बंद पडले. मात्र उद्योगांच्या दैनंदिन खर्चात कपात करता येत नाही. त्यामुळे नवीन गुंतवणूक नाही. रोजगारात वाढ नाही, कमी नफा, कमी उत्पादन, बाजारपेठा बंद असल्याने आणि मागणी कमी असल्याने उठाव नाही. त्यामुळे देशातील सर्व क्षेत्रात त्याचा विपरीत परिणाम होऊन देशाच्या आर्थिक विकासाचा वेग कमी झाला.

**(११)शिक्षण क्षेत्रावर परिणाम :**

कोरोनामुळे सर्वच विद्यार्थ्यांवर प्रचंड परिणाम झाला. शाळा, कॉलेज बंद झाली. परिक्षाही ठप्प झाल्या. ई–बुक्स वाचण आणि ई–लर्निगनं अभ्यास करणे वाढेल परंतु भारतासारख्या ठिकाणी ई–लर्निगच्या वापरावर बऱ्याच मर्यादा पडत आहे. कारण ग्रामीण भागात इंटरनेट सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होईल. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. परंतु या कोरोना महामारीच्या काळात शैक्षणिक कार्यासाठी मोबाईलचा वापर वाढलेला दिसून येतो. लहान मुले शाळेत गेली नाही तर त्यांच्यात सामाजिक जाणिवांचा विकास होणार नाही.

**(१२) कोरोनाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम :**

ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांची परिस्थिती अधिकच बिकट बनली. गृहकलह, एकाकीपणा, चिंता, भीती आणि नैराश्य यासारख्यांच प्रमाण खूप वाढत आहे. समाजातील लोकांच्या मनस्थितीवर व जीवनशैलीवर कोरोना महामारीचा विपरीत परिणाम झालेला आहे.

काही कोरोनाचे अनुकूल परिणाम सुद्धा दिसून येतात.

(१) लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटू लागले.
(२) निसर्गातील वातावरण शुद्ध झाले.
(३) धूर, धुळ, कर्कश आवाजापासून लोकांची सुटका झाली.

(४) आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली.
(५) लोकांमध्ये साघीक भावना वाढू लागलेली दिसून येते.

**उपाययोजना व निष्कर्ष :**

कोरोनाचे हे तिसरे वर्ष असून लसीकरणामुळे या वर्षी मृत्युचे प्रमाण कमी आहे. लॉकडाऊनच्या काळात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २० लाख कोटींचे (GDP च्या 10%) पॅकेज जाहीर करून देशातील विविध क्षेत्रासाठी आर्थिक मदत जाहीर केली. यात सिमांत शेतकरी, मजूर, छोटे उद्योग, शेती क्रेडिट कार्ड योजना, बांधकाम क्षेत्र अन्य उद्योग यांच्यासाठी सवलती जाहीर करून व अल्प दराने कर्ज पुरवठा करण्याचे धोरण आखून अर्थव्यवस्थेस गती देण्याचा प्रयत्न केला आहे. आय.टी.आय. रिटर्न्स भरण्यात मुदत वाढ दिली. महिलांच्या जन–धन खात्यात तीन महिने दरमहा ५०० रूपये प्रमाणे १५०० जमा केले गेले. रिजर्व बँकेने उद्योगांना स्वस्तात कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून रेपो दरात रिव्हर्स रेपो दरात कपात केली.

(१) ग्रामीण भागातील क्रयशक्ती वाढविण्यासाठी ग्रामीण भागाचा विकास व कृषी क्षेत्रात ग्रामीण रोजगारीवर भर देणारे कृषी धोरण राबविणे तसेच लघु व कुटीर उद्योगांना चालना मिळेल असे विकासाचे धोरण तयार करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर या कोरोनार संकटावर मात करून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास करता येते.
(२) भारतातील अंतर्गत बाजारपेठा विकसित करणे.
(३) फक्त मोठ्या उद्योगांवर अवलंबून न राहता लघु व मध्यम उद्योग आणि शेती तसेच शेतीशी संबंधित व्यवसाय यांच्याकडे विशेष लक्ष देवून त्यांची वाढ केली पाहिजे.
(४) कोरोना काळात सरकारने शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी, स्वस्त घर, सार्वजनिक वाहतुक या सगळ्या क्षेत्रांमध्ये भरमसाठ गुंतवणूक केली पाहिजे.
(५) सर्वांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणे.
(६) कर सवलत देणे.
(७) सर्वांना कोरोना प्रतिबंधक लस देणे.
(८) भारताची आरोग्य यंत्रणा सक्षम करणे.
(९) भारतामध्ये शिक्षण आणि आरोग्यावर होणाऱ्या खर्चामध्ये वाढ करण्याची गरज आहे. भारतात शिक्षणावर (GDP) च्या ३.४ टक्के व आरोग्यावर १.३ टक्के पर्यंत खर्च करण्यात येतो. शिक्षणावर (GDP) च्या ६ टक्के आणि आरोग्यावर गरजेपेक्षा कमी खर्च असल्यामुळे भारतात हॉस्पीटल, हॉस्पीटलमधील उपकरणे आणि संशोधन, बेड्स, डॉक्टरांची संख्या यासारख्या गोष्टींची कमतरता आहे.
(१०)भारतात अन्नधान्ये उत्पादनामध्ये वाढ झालेली दिसून येते. तांदूळ उत्पादनात देशाचा चीन नंतर दुसरा क्रमांक असून गहू उत्पादनात देश अग्रस्थानी आहे. तरीपण देशाला भूखमारी आणि कुपोषणाने ग्रासले आहे. सर्वात मोठी समस्या कृषी उत्पादनात सुधारणा करणेच नाही तर गरीब आणि गरजुंसाठी अन्नधान्याचे वाटप करणे महत्वाचे आहे.
(११)कृषी क्षेत्रासाठी बजट २०२१–२०२२ मध्ये १६३ लाख शेतकऱ्यांकडून १२०८ लाख मॅट्रीक टन गहू आणि धानाच्या खरेदीकरिता एमएसपी किंमतीद्वारे २.३७ लाख करोड उपए पेड करण्यात येणार आहे.
(१२)रसायनमुक्त शेतीसाठी प्रावधान करण्यात आले आहे.
(१३) तेल वर्गीय पिकांची आयात कमी करून देशांतर्गत पीक उत्पादनाला उत्तेजन देण्यावर भर देण्यात आलेला आहे.
(१४) कोविड–१९ मुळे विस्कळीत झालेल्या प्रधानमंत्री आवास योजनेकरिता ४८००० करोड रूपये निधी उपलब्ध करून ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात ८० लाख निवास बनविण्याची तरतूद करण्यात आली आहे.
(१५)पुर्वोत्तर भारतात ऑर्गेनिक कृषीकरिता ४५ करोड मंजूर करण्यात आले आहेत.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला पुर्वपदावर आणण्याकरिता केलेल्या तरतूदी तुटपूंज्या आहे असे बजेटकडे बघता लक्षात येते.

**संदर्भ :**

१६ मार्च २०२० तरूण भारत.
सोलापुरे भरतकुमार, 'मराठी अर्थशास्त्र परिषद, नियतकालीक, अर्थसंवाद', एप्रिल–जून २०२०, खंड ४४, अंक १
वावरे अनिलकुमार, 'मराठी अर्थशास्त्र परिषद नियतकालीक, अर्थसंवाद', जुलै–सप्टेंबर २०२०, खंड ४४, अंक २
Government of India (2019) Economics Survey Reports, New Delhi
International Monetary Funal (2020) Reports and Occasional, Publication, New York
पाटिल मनिषा हिंदुराव, 'Scholarly Report', Journal for Interdisciplinary Studies, April-June २०२१ कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था
https://www.worldometersinfo.com
Covid-19 India.org
www.economicstime.indiatime.com
माहोरे समित, (१६ ते २१ मे २०२०), 'कोरोनाचे संभाव्य आर्थिक परिणाम व दिशा', परिवर्तनाचा वाटसरू, पुणे, अंक २२१

माहोरे समित लक्ष्मण, (अक्टूबर–दिसंबर २०२१), 'भारत में कोविड–१९ और खाद्यान्न सुरक्षिरता/७५ / नागफनी, तिरूअनंतपुरम (केरल), अंक ३९

बजट २०२२–२०२३, फेब्रुवारी २०२२, भारत सरकार

A.G. Adeeth Carioppa; Kamlesh Kumar Achrya; Chaitanya Ashok Adhav; R. Sendhil and Ramasundaram, (2021), 'Impact of COVID-19 on the Indian Agricultural System : A 10 point strategy for post-pandemic recovery', outlook of agriculture, Vol. 50